# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - २३

## (सभावृत्तांत)

दिनांक–२३/०८/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २३/०८/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.उत्तम प्रकाश केंदळे
४) मा.मुंढे उषा अंकुश
५) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
७) मा.कुटे निर्मला संजय
८) मा.आशा धायगुडे-शेंडगे
९) मा.गोफणे अनुराधा देविदास
१०) मा.वैशाली जालिंदर काळभोर
११) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१२) मा.राजू मिसाळ
१३) मा.अमित राजेंद्र गावडे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त,मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर,मा.इंदलकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोत,मा.खोराटे,मा.बहुरे,मा.दांगट,मा.राऊत-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी(शिक्षणमंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.रत्नपारखी,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड, मा.भोसले,मा.मोरे,मा.पाटील-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.गाडेकर-प्रशासन अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.ऐवले-समाज विकास अधिकारी,मा.शिंपी-नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक २७) सर्पमित्र व प्राणीमित्र नेमणूकीबाबत – मा.राजू मिसाळ, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २८) प्र.क्र.३ च-होली येथील विविध विकास कामांना सल्लागार नेमणुकीबाबत – मा.वैशाली काळभोर, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २९) पिंपरी चिंचवड मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणूक करणेबाबत – मा.निर्मला कुटे, मा.हर्षल ढोरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३०) गिर्यारोहणासाठी अर्थसहाय्य देणेबाबत-मा.माधुरी कुलकर्णी,मा.हर्षल ढोरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३१) राष्ट्रीय अभियंता दिन साजरा करणेबाबत-मा.उत्तम केंदळे,मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३२) महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरिता आर्किटेक्ट,प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणेबाबत-मा.उत्तम केंदळे,मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३३) मनपाचे क,ड,ई क्षेत्रीय कार्यालयातील रस्ते सुशोभिकरण देखभाल कामाबाबत – मा.हर्षल ढोरे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३४) मनपाचे छत्रपती शिवाजी महाराज मधुबन सोसायटी सांगवी देखभाल व संरक्षण कामाबाबत – मा.हर्षल ढोरे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३५) मनपाची महिला व्यायामशाळा, सांगवी, पुणे-२७ सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत - मा.हर्षल ढोरे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३६) इनिस्पेक्शन ऑफ इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग ऑफ सीपीएस कोर्सचे फी ला कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक ३७) पिंपरी चिंचवड महोत्सव आयोजनाबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३८) क क्षेत्रीतील कॅन्टीन भाड्याने देणेबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३९) क प्रभाग क्षेत्रातील विविध विकास कामांकरिता आर्किटेक्ट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणेबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

-----------

**निर्णय– १)** मा.सहा.आयुक्त, आरोग्य विभाग यांना सूचना आहेत की, कोणत्याही प्रभागात व्हिजिट करण्यास जाण्याआधी त्या प्रभागाचे नगरसेवकांना संध्याकाळी एक दिवस अगोदर आपण व्हिजिट करण्यास येत आहात, याबाबत कळविणेत यावे. त्या प्रभागातील चारही नगरसेवकांबरोबर व्हिजिट करुन त्या भागातील समस्या जाणून घ्याव्यात. आपण उद्यापासून शहरातील प्रत्येक प्रभागांत सकाळपासून पाहणी सुरु करावी आणि येणा-या स्थायी समिती सभेमध्ये त्याची माहिती सादर करावी.

**२)** सर्व प्रभाग अधिका-यांनी त्यांच्याकडे जी काही वाहने, गाड्या, ट्रक उपलब्ध असतील ते कचरा उचलण्याच्या कामासाठी वापरावेत.

**३)** गणेशोत्सव जवळ आलेला असल्यामुळे सर्व ठेकेदारांना बोलावून घेऊन शहरातील घाण/कचरा उचलण्याचे नियोजन तात्काळ करावे.

**४)** विसर्जन हौदांबाबत नगरसेवकांकडून पोस्टर/पत्रकांद्वारे नागरीकांना त्याविषयी माहिती देऊन अवगत केले जाईल. मूर्त्या विरघळण्यासाठी अमोनियम बायकार्बोनेट विकत घेण्याबाबतीत विचार करावा. आहे त्याच ठिकाणी विसर्जन व्यवस्था चोख ठेवावी. प्रशासनाने त्यासाठी आवश्यक ती खरेदी करुन त्यास स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यास हरकत नाही.

**५)** सन्मा.सदस्य हर्षल ढोरे यांनी सांगवीतील जलतरण तलाव, शवदाहीनी, स्मशानभूमी, याबाबत सभेमध्ये ज्या समस्या मांडल्या आहेत, त्यावर प्रशासनाने अंमलबजावणी करावी.

-----------

ठराव क्रमांक –८३६ विषय क्रमांक – १
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/३७०/२०१७ दि.११/०८/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विद्युत विभागासाठी विविध लॅम्प आणि स्पेअर्स साहित्य खरेदीकामी ई निविदा सुचना क्र.५४/२/२०१६-१७ अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.ब्राईटशाईन असोसिएटस यांचे प्राप्त लघुत्तम दर बाब क्र. १ ,४ ,५, ६ व ७ चे लघुत्तम दर एकुण र.रु.५,३५,८००/- चे दर स्विकृत करून करारनामा व कामाचा आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८३७ विषय क्रमांक – २
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय,स्थापत्य
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इ/स्था/कावि/२/१३९८/२०१७ दि.७/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

च-होली प्रभाग क्र.७ मधील विकास आराखड्यातील विविध डि.पी रस्ते तसेच सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश केलेल्या डि.पी. रस्त्यांचा नियोजनबद्ध विकास करणेसाठी मे.पेव्हटेक कन्सल्टंट (श्री.विकास ठाकुर) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करून मनपाच्या प्रचलित दरानुसार निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी स्विकृत निविदा किंमतीच्या (Accepted Tender Cost ०.८०% व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी १.४५% फी अधिक सेवाकर (Service Tax) इ.याप्रमाणे देय निश्चित करून नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –८३८ विषय क्रमांक – ३
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय,स्थापत्य
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इ/स्था/कावि/२/१३९९/२०१७ दि.७/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

च-होली प्रभाग क्र.७ मधील विकास आराखड्यातील विविध डि.पी रस्ते तसेच सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश केलेल्या डि.पी. रस्त्यांचा नियोजनबद्ध विकास करणेसाठी मे.निल इन्फ्रास्ट्रक्चर अँण्ड कन्सल्टींग इंजिनिअर्स प्रा.लि. पुणे यांची सल्लागार म्हणून नेमणूक करून मनपाच्या प्रचलित दरानुसार निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी स्विकृत निविदा किंमतीच्या (Accepted Tender Cost) ०.८०% व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी १.४५% फी अधिक सेवाकर (Service Tax) इ. याप्रमाणे देय निश्चित करून नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८३९ विषय क्रमांक – ४
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग –ब क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक– मा.अनुराधा गोफणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षे/स्था/काविज/१२/२६४/२०१७ दि.१४/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमूद प्रमाणे चिंचवडगाव चापेकर चौक येथे भुयारी पादचारी मार्ग बनविणे या प्रकल्पासाठी मे. निल इन्फ्रास्ट्रक्चर यांची सदर कामाचा पुर्वानुभव लक्षात घेता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणुन नेमणुक करणेस व प्रकल्प तांत्रीक दृष्ट्या व यशस्वीपणे पुर्ण होणेकामी त्यांना याकरीता मनपाचे प्रचलित दरानुसार निविदापुर्व कामासाठी लघुत्तम निविदा रकमेच्या ०.९०% व निविदा पश्चात कामासाठी लघुत्तम निविदा रकमेच्या १.४५% असे एकुण २.३५%+ सेवाकर अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८४० विषय क्रमांक – ५
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१३७/२०१७ दि.१६/०८/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जून २०१७ मधील मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१३७/२०१७ दि.१६.०८.२०१७ अन्वये पाठविलेला अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८४१ विषय क्रमांक – ६
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१३६/२०१७ दि.१६/०८/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३१/०७/२०१७ ते दि.०६/०८/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१३१/२०१७ दि.०३.०८.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८४२ विषय क्रमांक – ७
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/६८८/२०१७ दि.९/८/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.३/२०१७-१८ मनपाचे कासारवाडी आय.टी.आय मुलींचे येथे उद्यान विकसित करणेकामी मे.बी.एस.एम एंटरप्रायजेस यांचे कोटेशन नोटीस अंदाजपत्रकिय दर र.रू.१,९८,९२५/- (अक्षरीर.रू.एक लाख अठ्यान्नव हजार नऊशे पंचवीस फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०६% ने कमी (र.रू.१,८६,९८९/-) या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश क्र.उद्यान/६/कावि/६८७/२०१७ दि.८/८/२०१७ अन्वये कामाचा आदेश आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८४३ विषय क्रमांक – ८
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – स्थापत्य उद्यान
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था.उ/कावि/६२/२०१७ दि.१४/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये विविध मोठ्या प्रकल्पांची कामे केली जातात. सदर प्रकल्पांचे आराखडे, अंदाजपत्रक इ. तयार करणेसाठी मनपाने आर्किटेक्ट पॅनल गठीत केलेले आहे. सदर पॅनलवरील आर्किटेक्टची अशा प्रकल्पासाठी नेमणूक केली जाते. भांडारकर-खरोटे असोसिएटस यांनी दि.२३/०७/२०१७ च्यापत्रान्वये मनपाची वास्तुविशारद विषयक कामे करण्याची तयारी दर्शविली असून म.न.पा आर्किटेक्ट पॅनलमध्ये त्यांचा समावेश करण्याची विनंती केली आहे. त्यांना असलेल्या सरकारी/निमसरकारी को.ऑप इन्स्टिट्यूटस येथील कामांचा व विविध प्रकल्पांचा अनुभव विचारात घेता त्यांची म.न.पा आर्किटेक्ट पॅनलवर नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रस्तावित केल्याप्रमाणे भांडारकर-खरोटे असोसिएटस् यांचेबरोबर सॉलअर्च आर्किटेक्ट (SoulArch Architects) यांचीही महानगरपालिकेच्या पॅनेलवर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –८४४ विषय क्रमांक – ९
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – स्थापत्य बीआरटीएस
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक– मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/४९७/२०१७ दि.१६/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बीआरटीएस विभागामार्फत केंद्रशासनाचे शहरी विकास विभाग यांचे सुचनेवरुन जागतिक बँक व SUTP यांचे संयुक्त विदयमाने दि.२६ व २७ मे,२०१७ रोजी राष्ट्रीय बीआरटीएस गोलमेज परिषद यशस्वीपणे आयोजित करणेत आली होती. या परिषदेसाठी मनपाच्या मा.महापौर, मा.अध्यक्षा स्थायी समिती, मा.उपमहापौर व सर्व पदाधिकारी या परिषदेकरीता उपस्थित होते. त्यांच्या सहभागामुळे पदाधिका-यांना बीआरटी विषयक अधिक माहिती मिळणेकामी पदाधिका-यांचा अभ्यास दौरा अहमदाबाद येथे आयोजित करावा अशी सूचना जागतिक बँकेच्या वरीष्ठ वाहतुक तंत्रज्ञ श्रीमती नुपूर गुप्ता तसेच शहरी विकास विभागाकडील उपस्थित मा.श्री.पी.के.मिश्रा यांनी केलेली आहे. त्याअनुषंगाने Central For Excellence In Public Transport (CEPT) अहमदाबादचे शिवानंद स्वामी यांनी अडीच दिवसाच्या कार्यशाळेची विषयसुची अंतिम करणेबाबत दि. २७/०६/२०१७ रोजीच्या ई-मेल द्वारे विचारणा केलेली आहे. तसेच श्री शिवानंद स्वामी यांचेशी प्रत्यक्ष चर्चेअंती त्यांनी दि.०१/०८/२०१७ रोजीच्या ई-मेल द्वारे सुधारीत कार्यक्रम पत्रिका पाठविलेली आहे. या अडीच दिवसांचे कार्यशाळेमध्ये खालील विषयांवर सादरीकरण आयोजित केलेले आहे.

१. विकास योजना (Development Plans)
२. गमनशीलता योजना (Mobility Plans),
३. नगर नियोजन योजना (Town Planning Schemes)
४. स्थानिक पुनर्विकास योजना (Redevelopment Plans, Local area plans)
५. नदी विकास योजना (River Front development),
६. वर्तुळाकार रस्ते (Ring Road)
७. मेट्रो वाहतुक प्रणाली, (Metro System)
८. बीआरटीएस वाहतुक प्रणाली (BRTS System)
९. अहमदाबाद शहरातील सांस्कृतिक स्थळांना भेटी, सांस्कृतिक/हेरिटेज वॉक

या बाबींचे आयोजन केलेले आहे. सदरचे विषय मनपाचे आर्थिक, सामाजिक विकासाशी संबंधित असल्याने या पुढील शहराचे विकासासाठी स्मार्ट सिटी प्रकल्पाचे नियोजनामध्ये उपयुक्त ठरणार आहेत. या अडीच दिवसाच्या कार्यशाळेमध्ये मा. शिवानंद स्वामी यांनी सुचविलेले सर्व विषयांचा अंतर्भाव होत असल्याने सदरची विशेष सूची मान्यतेकामी सविनय सादर. विषयसूची मान्यतेनंतर मा. शिवानंद स्वामी यांना ई-मेल द्वारे कळविणेत येईल. सदर कार्यशाळेसाठी मनपातील मा. महापौर,मा.उपमहापौर, मा. स्थायी समिती अध्यक्षासह सर्व नगरसदस्य/नगरसदस्या याचें समवेत मनपाचे अधिकारी यांना प्रस्तावात नमूदप्रमाणे तीन टप्प्यामध्ये पाठविणेच्या कालबध्द दौ-याचे नियोजन करणेत आले आहे. सदर दौ-यांचे दृष्टीने मा.महापौर यांचे मान्यतेने ३/४ तारांकीत हॉटेलमध्ये निवासाची व भोजनाची सोय करणेत येईल. तसेच पुणे-अहमदाबाद-पुणे असा विमान प्रवास या करीता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर दौ-याचा खर्च GEF फंडामधुन खर्च करणे शक्य होणार आहे. तरी सदर कार्यशाळेची विषयसूची अंतिम करणेस व सदर कार्यशाळेसाठी मनपाकडील

प्रस्तावात नमूद पदाधिकारी/अधिकारी यांना पाठविणेस व सदर दौ-याचा प्रत्यक्ष खर्च GEF फंडामधुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८४५ विषय क्रमांक – १०
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/७१०/२०१७ दि.१८/०७/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०७/२०१६-१७ अन्वये से.नं.२७ येथील माऊली उद्यानाचे नुतनीकरण करणेकामी मे.तावरे कंन्स्ट्रक्शन कंपनी या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा रक्कम रुपये ५,२९,१२२/- (अक्षरी र.रू. पाच लाख एकोणतीस हजार एकशे बावीस फक्त) पेक्षा -२२.०९ कमी दराने स्विकृत करून कामाचा आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८४६ विषय क्रमांक – ११
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक– मा.अनुराधा गोफणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२६१/२०१७ दि.१८/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.2/2017-18 मधील अ.क्र.1 अन्वये प्र.क्र.५५ पिंपळे सौदागर मधील अंतर्गत १८ मी.डी.पी.रस्त्यांवर दुतर्फा बाजूस पोल बसवून प्रकाश व्यवस्था करणेकामी मे.आर.एन. एंटरप्रायजेस नि.र.रू.38,66,590/- (अक्षरी र.रू.अडोतीस लाख सहासष्ठ हजार पाचशे नव्वद फक्त) पेक्षा 19.50% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८४७ विषय क्रमांक – १२
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/४१२/२०१७ दि.१६/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे विविध विषयांवरील देखाव्यांच्या स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. त्याकरीता मा. पोलिस आयुक्त व महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शांतता बैठक आयोजित केली जाते. त्या अनुषंगाने शांतता बैठकीबाबत रंगमंदिर भाडे, फ्लेक्स, बॅनर्स, परिक्षण समितीचे मानधन, चहापान, भोजन, स्पर्धेतील विजेत्या मंडळास धनादेशाद्वारे बक्षिसांची रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्रक देवून सत्कार केला जातो. इ.

व्यवस्थेकरीता तसेच गणेश विसर्जनाचे दिवशी पत्रकारांचे भोजन व्यवस्थेकरीता त्याचप्रमाणे गणेशमंडळ कार्यकर्त्यांना चहापान व इतर व्यवस्था तातडीने खर्च करावा लागणार आहे. याकरीता थेट पध्दतीने अंदाजे र.रु.७,००,०००/-(अक्षरी र,रु.सात लाख फक्त) होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८४८ विषय क्रमांक – १३

दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/५११/२०१७ दि.१६/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.३/२/२०१७-१८ अन्वये मनपाच्या थेरगाव गावठाण,थेरगाव स.नं.९, थेरगाव लक्ष्मणनगर, काळाखडक वाकड व काळाखडक बुस्टर,पुनावळे येथील पंपहाऊसचे चालन करणेकामी मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू.४१,६६,५३६/- (अक्षरी र.रू.एकेचाळीस लाख सहासष्ट हजार पाचशे छत्तीस फक्त) पेक्षा ०.०५% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.४३,७२,६७५/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८४९ विषय क्रमांक – १४

दिनांक – २३/०८/२०१७ विभाग- लेखा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/१/कावि/७१४९/२०१७ दि.१९/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२५६ दि.२५/४/२०१७ अन्वये मंजुरी दिलेल्या व खर्च न झालेल्या र.रू.३१.८३ कोटी मधून स्थापत्य विभागाकडील प्रस्तावात नमूद प्रपत्राप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुद नसलेली र.रू.२८.९९ कोटीची बिले अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच विषयपत्रासोबतच्या पानांक २१ वरील अनु.क्र.१८ पूर्ण वगळून व पानांक ३० वरील अनु.क्र.६ वगळून प्रस्तुत विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८५० विषय क्रमांक – १५

दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं/१/कावि/४८७/२०१७ दि.१६/०८/२०१७

विषय – महानगरपालिका औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी/कासारवाडी मध्ये तासिका तत्वावर

कार्यरत असलेल्या निदेशकांस तासिका दरामध्ये वाढ करणेबाबत...

विषय क्रमांक १५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-** १) यापूर्वी झालेल्या मा.स्थायी समिती सभांमध्ये मा.प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र यांना जे जे आदेश देण्यात आले होते, त्यांची अद्यापपर्यंत आपलेकडून पूर्तता झालेली नाही. जी माहिती मागविली होती, सादरीकरण करण्यास सांगितले होते, त्याप्रमाणे स्थायी समितीपुढे सादरीकरण केलेले नाही. फी कमी करणेबाबत सांगण्यात आले होते. शिक्षिकेची नियुक्ती करण्यास सांगितले होते. मा.स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी आपलेकडून झालेली नाही. ज्यांना स्थायी समितीच्या निर्णयाचा मान ठेवायचा नाही त्यांनी या समितीपुढे विषय घेऊन येऊ नये.

२) जोपर्यंत मागितलेली माहिती मा.स्थायी समितीपुढे सादर करत नाहीत तोपर्यंत या विषयाला मान्यता दिली जाणार नाही.

३) महिला आयटीआय करिता महिला प्राचार्यांची नियुक्ती करणेत यावी. दोन आयटीआयसाठी दोन प्राचार्यांची नियुक्ती करावी. मा.पाटील यांना एखाद्या शाळेत शिक्षक म्हणून किंवा अन्य दुस-या विभागात पाठविण्यात यावे. याबाबत मा.सहा.आयुक्त, प्रशासन यांनी पर्याय द्यावा.

४) मागील सभेमध्ये आयटीआयमधील एका शिक्षिकेबाबत विषय केला होता. त्या शिक्षिकेकडून सात/आठ विषय शिकवून घेतात. त्यांचे झालेले नुकसान कोण भरुन काढणार याबाबत मा.अति.आयुक्त, आपण ही जबाबदारी निश्चित करावी.

५) प्रशासनाला सूचना आहेत की, महापालिकेत एकल पद असलेले अधिकारी कार्यक्षमतेने काम करत नसतील तर प्रशासनाने तिथे सगळ्या तरतूदींचा वापर करावा. अशा अधिका-यांना घरी बसवावे किंवा त्यांना दूसरीकडे काम द्यावे. अशा काही तरतूदी वापरता येत असतील तर पुढील स्थायी समितीमध्ये याबाबत माहिती द्यावी.

६) ठरावाची अंमलबजावणी होईपर्यंत हा विषय तहकूब करणेत येत आहे.

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक –८५१ | विषय क्रमांक – १६ |
| दिनांक – २३/०८/२०१७ | विभाग – स्थापत्य |
| सूचक – मा.उषा मुंढे | अनुमोदक– मा.माधुरी कुलकर्णी |

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/कावि/७/१९६/२०१७ दि.१९/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील रस्ते व आरक्षणे विकसित करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रस्तावात नमूद केलेली कामे अंदाजपत्रकात समाविष्ठ आहेत, तथापि सदर काम करण्यासाठी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतूदी पुरेशा नाहीत. सदर कामांसाठी तरतूदीची व्यवस्था करून देणे आवश्यक आहे. सन २०१७-१८ चे भांडवली अंदाजपत्रक क्र.३, भाग-२ पान क्र. ३७६, ३७७, अ.क्र.४ वर शहर विकास आराखडा या लेखाशिर्षाखाली एकूण र.रू. २०५ कोटी तरतूद करणेत आलेली आहे. त्यामधून तरतूद वर्ग करणेकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे त्या कामासमोर दर्शविलेल्या रकमा वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –८५२ विषय क्रमांक – १७
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – लेखा
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/७१८१/२०१७ दि.१९/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

जलनि:सारण विभागाकडील प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद केलेप्रमाणे तरतूद वर्गीकरण रक्कम रुपये १,८९,४९,०००/- इतकी भांडवली कामे संबंधित लेखाशिर्षामधुनच वर्गीकरण सूचविणेत आलेले आहे. अंदाजपत्रकातील सदरील रक्कम वर्गीकरणास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ मधील तरतूद क्र.२ (१) नुसार मान्यता देणेत येत आहे. तसेच वरील विषयास अनुसरुन सन २०१७-१८ जलनिःसारण विभागातील विविध विकास कामांसाठी ई क्षेत्रिय कार्यालयातील भांडवली खर्चविषयक काम तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अनु. क्र. | सन २०१७-१८ मधील अंदाजपत्रकीय र.रु. | वर्गीकरण व आवश्यकतेनुसार होणारी | | एकूण र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वाढ | घट | |
| १. | च-होली मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्र.क्र.७ च-होली मधील मलवाहिनी सुधारणा कामे करणे. | भांडवली खर्च | ५७१ | ३ | २०००००० | ५०००० | ० | २५०००० |
| २. | च-होली मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्र.क्र.६ मोशी मधील मलवाहिनी सुधारणा कामे करणे. | भांडवली खर्च | ५७१ | ८ | २४०००० | ७६०००० | ० | १०००००० |
| ३. | च-होली येथे Sewerage treatment plant बांधणे. | भांडवली खर्च | ५७१ | ८ | ७०००००००० | ० | १२५०००० | १२५००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८५३ विषय क्रमांक – १८
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – लेखा
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/७१८२/२०१७ दि.१९/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद केलेप्रमाणे तरतूद वर्गीकरण रक्कम रुपये ३,६२,०७,५००/- इतकी भांडवली कामे पाणीपुरवठा विशेष योजना निधी या लेखाशिर्षामधुन वर्गीकरण सूचविणेत आलेले आहे. अंदाजपत्रकातील सदरील रक्कम वर्गीकरणास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ मधील तरतूद क्र.२ (१) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –८५४ विषय क्रमांक – १९
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क कक्ष
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/४०६/२०१७ दि.१९/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महापालिकेने शहरामध्ये व गस्तीच्या ठिकाणी तसेच झोपडपट्टीमध्ये पथनाट्ये सादर करणे, फ्लेक्स व होर्डिंग लावणे, महिला बचत गटांद्वारे मतदार जनजागृती करणे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वकृत्व स्पर्धा करणे, सोसायटी चेअरमन व सभासदांचे मेळावे घेणे, कामगारांचे मेळावे घेणे, ज्येष्ठ नागरिक संघ व घरकुलवासियांचे मेळावे घेणे, कंपनी मालक व कामगारांचे मेळावे घेणे, शहरातील गॅस वितरकांद्वारे मतदान करणेबाबतचे स्टिकर्स वितरित करणे, मॅरेथॉन स्पर्धा व सायकल रॅली स्पर्धा आयोजित करणे, पीएमपीएमएल बसेसवर व रिक्षावर स्टिकर्स लावणे, रेडिओवर जाहिरात करणे, वृत्तपत्रे, सोशल मिडीया, ऑडीओ व्हिडीओ क्लिप, स्थानिक केबलव्दारे जाहिरात करणे, स्काय बलुन, एलईडी स्क्रिन यांच्यामार्फत प्रचार करणे इ. उपक्रम राबवून जनजागृती करणेबाबत मोठयाप्रमाणावर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने तातडीच्या होणा-या खर्चासाठी अंदाजे र.रु.८१,३६,५००/- इतक्या खर्चास दि.११/०१/२०१७ रोजीच्या प्रस्तावान्वये मा. आयुक्त यांची मान्यता घेऊन दि.११/०१/२०१७ रोजी मा. स्थायी समिती सभेपुढे मंजूरीकामी सादर करण्यात आला होता. सदर खर्चास ठराव क्र.३३८, दि.११/०५/२०१७ अन्वये मा. स्थायी समिती सभेने मान्यता दिलेली आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत मा. राज्य निवडणूक आयोग यांनी बैठकींमध्ये वेळोवेळी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने विविध अतिरिक्त उपक्रम राबवून मोठया प्रमाणावर जनजागृती करणेत आली आहे. यामुळे मंजूर खर्चा व्यतिरिक्त र.रु.९१,१७,७६०/-इतका वाढिव खर्च झाला असून त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८५५ विषय क्रमांक – २०
दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – क्रीडा
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक– मा.अनुराधा गोफणे
संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१७ दि.२७/०७/२०१७

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ३५ दिनांक ११/०८/२०१७ नुसार

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२ दि.०४/०७/२०१२ अन्वये, म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडू करिता खेळाडू दत्तक योजना राबविणे बाबतच्या धोरणास मान्यता दिली असून, सदर खेळाडू दत्तक योजना दि.०४/०७/२०१२ पासून राबविणेबाबत अंमलबजावणी करणेस मान्यता दिलेली आहे. खेळाडू दत्तक योजना २०१६-१७ (पाचवी बॅच) अनुषंगाने वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देऊन दि.२५/०८/२०१६ ते २०/०९/२०१६ या कालावधीत अर्ज मागविले असता एकूण ८९ खेळाडूंचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्या अर्जांवर क्रीडा अधिकारी, खेळाडू दत्तक योजना प्रमुख व संबंधित खेळाचे क्रीडा पर्यवेक्षक यांनी प्रस्तावात नमुद प्रमाणे एकूण ८९ अर्जांपैकी ४७ खेळाडूंचे अर्ज पात्र करून खेळाडू दत्तक योजना

२०१६-१७ चा लाभ २ वर्षाकरीता देणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या खर्चास र.रु.१,०२,५९,२००/- (अक्षरी र.रु.एक कोटी, दोन लाख, एकोणसाठ हजार दोनशे फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या  लेखा शिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८५६ विषय क्रमांक – २१

दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – क्रीडा

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भः- १) मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१८९/२०१७ दि.२७/०७/२०१७

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ३६ दिनांक ११/०८/२०१७ नुसार

विषय - पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१७–१८ चा लाभ १ वर्षाकरीता देणेबाबत...

विषय क्रमांक २१चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८५७ विषय क्रमांक – २२

दिनांक – २३/०८/२०१७ विभाग – सार्वजनिक वाचनालय

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भः- १) मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.सावा/२/कावि/७२२/२०१७ दि.०३/०८/२०१७

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ३७ दिनांक ११/०८/२०१७ नुसार

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत चालविण्यात येणा-या सार्वजनिक वाचनालयांकरीता मे.हिंदुस्थान प्रकाशन संस्था यांचेकडुन साप्ताहिक विवेक साप्ताहिकांची पाच वर्षासाठी थेट पध्दतीने खरेदी करणेस तसेच त्यासाठी येणारा खर्च र.रु.२०,८००/- (अक्षरी र.रु. वीस हजार आठशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८५८ विषय क्रमांक – २३

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भः- १) मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ३८ दिनांक ११/०८/२०१७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जिल्हास्तरीय महापौर चषक कराटे स्पर्धा, प्रभाग क्र.१८ मध्ये मोरया गोसावी क्रीडांगण चिंचवडगाव या ठिकाणी घेण्यात याव्यात. सदर स्पर्धेचे आयोजन-नियोजन करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –८५९ विषय क्रमांक – २४

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक– मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- १) मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ३९ दिनांक ११/०८/२०१७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी येथील सहल केंद्रामधील तलावाजवळ मनपा व्यायामशाळा आहे. ही व्यायामशाळा Apple fitness club भोसरी यांना ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.र.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावार चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८६० विषय क्रमांक – २५

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ:- १) मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ४० दिनांक ११/०८/२०१७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागामार्फत संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी लॉन टेनिस कोर्ट, शिवसाम्राज्य प्रतिष्ठान, भोसरी या संस्थेस ५ वर्षाच्या भाडेतत्वावर मनपाच्या अटी व शर्तीनुसार चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समितीचा प्रस्ताव असलातरी प्रस्तावीत केलेले संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी लॉन टेनिस कोर्ट हे शिवसाम्राज्य प्रतिष्ठान, भोसरी या संस्थेऐवजी पिंपरी चिंचवड लॉन टेनिस ऍकॅडमी या संस्थेस ५ वर्षांच्या भाडेतत्वावर मनपाच्या अटी व शर्तीनुसार चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८६१ विषय क्रमांक – २६

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ४१ दिनांक ११/०८/२०१७ नुसार

सेक्टर २६, निगडी-आकुर्डी प्राधिकरण लॉन टेनिस कोर्ट भाडेतत्वावर मनपा नियमानुसार पाच वर्षे कालावधीकरिता एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेस देण्यात यावा. एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेचा रजिस्टर नंबर महा १८५७/२०१२ हा आहे. मनपा नियमानुसार सदरची संस्था भाडे देण्यास तयार आहे. एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेचे काम अतिशय चांगल्या पध्दतीचे आहे. तरी सदरचे लॉन टेनिस कोर्ट एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेस भाडे तत्वावर देणेस मान्यता

देणेबाबत मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समितीचा प्रस्ताव असलातरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेक्टर क्र.२६ प्राधिकरण येथील लॉन टेनिस कोर्ट हे एकविरा सेवा संघ चिंचवड या संस्थेऐवजी मनोज कुसाळकर टेनिस अकादमी सांगवी या संस्थेस ३ वर्षांच्या भाडेतत्वावर मनपा अटी शर्तीनुसार चालविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक –८६२ विषय क्रमांक – २७

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.राजू मिसाळ, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव –

श्री.मोहित डेव्हीड जोधपूरकर, श्री.विशाल प्रकाश खोले, श्री.राजू अशोक कदम व श्री.योगेश श्रीकृष्ण कांजवणे हे उत्तम सर्पमित्र असून त्यांनी यापूर्वी महानगरपालिकेत सर्पमित्र व प्राणीमित्र म्हणून मानधनावर काम केले आहे. त्यांचा कामाचा पूर्वानुभव तसेच सर्पमित्रांची व प्राणीमित्रांची आवश्यकता विचारात घेता त्यांची सर्पमित्र व प्राणीमित्र म्हणून दरमहा र.रु.१०,०००/- एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८६३ विषय क्रमांक – २८

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.वैशाली काळभोर, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.३ मोशी/च-होली येथील विविध कामांच्या समावेश मनपाच्या अंदाजपत्रकात करणेत आलेला आहे. सदरची विकास कामे नियोजनबद्ध पद्धतीने करणेकरीता प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार मनपाच्या पॅनेलवरील सल्लागाराची नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८६४ विषय क्रमांक – २९

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.निर्मला कुटे,मा.हर्षल ढोरे यांचा प्रस्ताव...

आर्किटेक्ट श्री.हेमंत महादेव कदम व श्री.सतिश हेमंत कदम यांनी मे.एच.एम.कदम अँड असोसिएटस्, पुणे या संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यात व परराज्यात देखील कला क्षेत्राशी निगडीत अनेक शासकीय व खाजगी स्वरुपाची मोठ्या प्रमाणात उल्लेखनीय प्रकल्पांचे नियोजन करुन पूर्णत्वास नेले आहेत. म.न.पा.मध्ये कला क्षेत्राशी निगडीत अनेक कामे चालू असून, त्यामध्ये त्यांचा अनुभवाचा व या क्षेत्रातील त्यांचा ज्ञानाचा फायदा म.न.पा.स होणेच्या दृष्टीने, त्यांची म.न.पा.च्या आर्किटेक्ट पॅनेलवर नियुक्ती करावी लागणार आहे व त्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी म.न.पा.च्या आर्किटेक्ट पॅनेलवर आर्किटेक्ट म्हणुन नियुक्ती झाल्यास त्यांना पॅनेलच्या अटी व शर्तीनुसार करारनामा करुन प्रकल्प खर्चाच्या रक्कमेच्या २.००% अधिक कर फी अदा करणेत येणार आहे. सदर नियुक्ती सन २०१७-२०२० या कालावधी करिता करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच आर्किटेक्ट श्री.हेमंत महादेव कदम व श्री.सतिश हेमंत कदम यांचा मे.एच.एम.कदम अँड असोसिएटस्,पुणे या संस्थेस प्राधिकरण निगडी येथील संत तुकाराम व्यापारी संकुलातील म.न.पा.च्या संगित अकादमीच्या नुतनीकरणाच्या कामाकरिता आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८६५ विषय क्रमांक – ३०

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.माधुरी कुलकर्णी,मा.हर्षल ढोरे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील खालील गिर्यारोहकांना Indian Mountaineering Foundation यांनी Peak Deo Tibha (6001 M) in HP या गिर्यारोहण मोहीमेसाठी मान्यता दिली आहे.

१) कु.सारिका रमेश पाटील
२) कु.प्रतिभा ज्ञानदेव ढाकणे
३) श्री.ओंकार शिवाजी यादव
४) श्री.प्रितम भाऊसाहेब बागडे

वरील गिर्यारोहकांना मनपा नियमानुसार गिर्यारोहण मोहीमेकरीता अर्थसहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८६६ विषय क्रमांक – ३१

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे,मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दरवर्षी राष्ट्रीय अभियंता दिन साजरा करणेत येत असतो. तरी, चालू वर्षी राष्ट्रीय अभियंता दिन साजरा करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच राष्ट्रीय अभियंता दिन साजरा करणेकामी आवश्यक ती सर्व कार्यवाही करणेचे अधिकार मा.आयुक्त सो यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर कामी येणारा प्रत्यक्ष खर्च हा कामगार कल्याण विभागाकडील 'सांस्कृतिक कार्यक्रम' या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८६७ विषय क्रमांक – ३२

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे,मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

दि.२/८/२०१७ रोजी मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.४३, ठराव क्र.७६३ नुसार खालीलप्रमाणे मान्य केला आहे.

"महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरिता आर्किटेक्ट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अंदाजपत्रकातील प्रस्तावित कामे करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदापुर्व कार्यवाहीपर्यंत सर्व कामे करणे यासाठी त्यांची म.न.पा. पॅनेलवरील वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना म.न.पा. मान्य दराने १ ते १५ पर्यंतच्या कामांसाठी (भाग-१) कामाच्या निविदा रकमेच्या र.रु.५० लाखापर्यंत ३% + सेवाकर व लाखाच्या पुढे २ % + सेवाकर, तसेच पी.एम.सी. (प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार) निविदा पश्चात कामासाठी निविदा रकमेच्या १.३५% + सेवाकर रस्तेविषयक कामांसाठी प्रस्तावात नमूद १ ते ८ (भाग-२) निविदा रकमेच्या एकूण फी २.२५ % + सेवाकर (निविदा पुर्व = ०.८०% + सेवाकर) व निविदा नंतरचे कामासाठी १.४५% + सेवाकर याप्रमाणे सर्व करांसह फी अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे."

सदर ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत आहे –

"महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरिता आर्किटेक्ट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अंदाजपत्रकातील प्रस्तावित कामे करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदापुर्व कार्यवाहीपर्यंत सर्व कामे करणे. यासाठी त्यांची म.न.पा. पॅनेलवरील वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांनी दि.१०/०८/२०१७ रोजी मंजुर केलेल्या दरांप्रमाणे फी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे."

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८६८ विषय क्रमांक – ३३

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.हर्षल ढोरे,मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

मनपाचे क,ड,ई क्षेत्रीय कार्यालयांतील रस्ते सुशोभिकरण देखभाल कामाची निविदा प्रसिद्ध करणेत आली होती. सदर निविदेस प्रतिसाद मिळत नसलेने सदरचे काम स्थानिक लोकांचा सहभाग व्हावा, कामकाज चांगले व्हावे या हेतुने सदरचे कामकाज मे.एस.डी.एंटरप्रायजेस यांना सध्याचे प्रचलित दराने २ वर्षे कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८६९ विषय क्रमांक – ३४

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.हर्षल ढोरे,मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

मनपाचे छत्रपती शिवाजी महाराज मधुबन सोसायटी, सांगवी या उद्यान देखभाल व संरक्षण कामाची निविदा मागविणेत आली होती. सध्याचे कमी दराचे ठेकेदार यांनी काम करणेस असमर्थता दर्शविलेली असलेने पुढील कालावधीसाठी उद्यान देखभाल व संरक्षणाचे कामकाज सांगवी येथील स्थानिक लोकांचा सहभाग असावा या हेतूने स्थानिक असलेली संस्था मे.राधेकृष्ण इंटरप्रायजेस यांना निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३३.३२ या कमी दराने २ वर्षे कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८७० विषय क्रमांक – ३५

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.हर्षल ढोरे,मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

म.न.पा.ची महिला व्यायामशाळा, सांगवी, पुणे-२७ ही व्यायामशाळा मनोहरी महिला बचत गट, सांगवी, पुणे – २७ ही संस्था ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- म.न.पा.कडून घेऊन, सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी. म.न.पा.ची महिला व्यायाम शाळा, सांगवी, पुणे २७ ही व्यायामशाळा मनोहरी महिला बचत गट, सांगवी, पुणे – २७ या संस्थेस ११ महिने दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- म.न.पा.कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८७१ विषय क्रमांक – ३६

दिनांक – २३/०८/२०१७ विभाग- यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/११/कावि/४४४/२०१७ दि.२३/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये सी.पी.एस.कोर्सच्या मान्यतेकरीता मा.स्थायी समिती यांचेकडून ठराव क्र.८०९ दि.१०/०८/२०१७ रोजी मान्यता घेऊन अफिलेशन फी र.रु.१४,४०,०००/- (अक्षरी चौदा लाख चाळीस हजार फक्त) अदा केलेली आहे व उर्वरीत म्हणजेच र.रु.६,६८,०००/- (अक्षरी सहा लाख अड्डसष्ठ हजार फक्त) फी ही कॉलेज ऑफ फिजिशियन अँन्ड सर्जन, मुंबई (सी.पी.एस.) यांना डिमांड ड्राफ्टद्वारे अदा केली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८७२ विषय क्रमांक – ३७

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महोत्सवाचे आयोजन करण्याबाबत मा.स्थायी समिती ठ.क्र.८१६ दि.१०/०८/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर महोत्सवाचे आयोजनामध्ये महिलांसाठी लावणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यास तसेच सदर महोत्सव रामकृष्ण मोरे सभागृह, चिंचवड यासह अंकुशराव लांडगे सभागृह, भोसरी, नटसम्राट निळू फूले सभागृह, पिंपळेगुरव व आचार्य अत्रे सभागृह, संततुकारामनगर या ठिकाणीही दि.१, २ व ३ सप्टेंबर रोजी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८७३ विषय क्रमांक – ३८

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

क क्षेत्रीय कार्यालयाकडे असणारे कॅन्टीन महापालिका ठरवेल त्या भाडेदराने तुळजाभवानी बचतगट, भोसरी यांना ५ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८७४ विषय क्रमांक – ३९

दिनांक – २३/०८/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

दि.२/८/२०१७ रोजी मा.स्थायी समिती सभेने विषय क्र. ४१, ठराव क्र.७६१ नुसार खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

"क प्रभागामध्ये विविध विकास कामे (उदा.रस्ते,शाळा,क्रिडांगणे इ.) करणेसाठी आर्किटेक्ट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अंदाजपत्रकातील प्रस्तावित कामे करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदापुर्व कार्यवाहीपर्यंत सर्व कामे करणे यासाठी त्यांची म.न.पा. पॅनेलवरील वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना म.न.पा. मान्य दराने १ ते १६ पर्यंतच्या कामांसाठी (भाग-१) कामाच्या निविदा रकमेच्या र.रु.५० लाखापर्यंत ३% + सेवाकर व लाखाच्या पुढे २ % + सेवाकर, तसेच पी.एम.सी. (प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार) निविदा पश्चात कामासाठी निविदा रकमेच्या १.३५% + सेवाकर रस्तेविषयक कामांसाठी प्रस्तावात नमूद १ ते ८ (भाग-२) निविदा रकमेच्या एकूण फी २.२५ % + सेवाकर (निविदा पुर्व = ०.८०% + सेवाकर) व निविदा नंतरचे कामासाठी १.४५% + सेवाकर याप्रमाणे सर्व करांसह फी अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे."

सदर ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत आहे –

"क प्रभागामधील विविध विकास कामांकरिता आर्किटेक्ट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अंदाजपत्रकातील प्रस्तावित कामे करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदापुर्व कार्यवाहीपर्यंत सर्व कामे करणे. यासाठी त्यांची म.न.पा. पॅनेलवरील वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांनी दि.१०/०८/२०१७ रोजी मंजुर केलेल्या दरांप्रमाणे फी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे."

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/६६/२०१७
दिनांक - ३०/०८/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.